# मिरा भाईंदर महानगरपालिका

# माहिती व जनसंपर्क विभाग

# प्रेसनोट

- **मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार 08 शाळांचे सीसीटीव्ही नियंत्रण मध्यवर्ती केंद्रित करण्याची कार्यवाही पूर्ण**
- **उर्वरित सर्व शाळांचे सीसीटीव्ही नियंत्रण दिनांक 05 सप्टेंबर 2024 पूर्वी मध्यवर्ती केंद्रित करण्याचे मा. आयुक्त यांचे निर्देश**

दिनांक 2 सप्टेंबर 2024 रोजी मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी सीसीटीव्ही नियंत्रण कक्षास भेट देऊन तेथील कामकाजाची पाहणी केली. सदर पाहणी दरम्यान अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, उपायुक्त (मुख्यालय) संजय दोंदे, उपायुक्त प्रसाद शिंगटे, सिस्टीम मॅनेजर राज घरत, सिस्टीम ॲनालिस्ट मनस्वी म्हात्रे व महापालिका कर्मचारी उपस्थित होते.

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महापालिकेच्या एकूण 36 शाळा असून या शाळांमध्ये दहा हजार विद्यार्थी हे शिक्षण घेत आहेत. शाळेच्या व विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेच्या दृष्टिकोनातून महापालिकेने यापूर्वी सर्व म्हणजेच एकूण 36 शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे काम पूर्ण केले होते. सदर सीसीटीव्हीचे नियंत्रण हे त्या त्या शाळेतील मुख्याध्यापकांकडे देण्यात आले होते. महाराष्ट्र शासनाचे निर्णय व मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार सर्व शाळेतील सीसीटीव्ही नियंत्रण हे मध्यवर्ती केंद्रित करण्यात येत आहेत. आतापर्यंत एकूण आठ शाळांचे सीसीटीव्ही नियंत्रण हे मध्यवर्ती केंद्रित करण्यात आले असून मा. आयुक्त यांनी त्याचा आढावा घेऊन समाधान व्यक्त केले. शाळेतील परिसर, वर्ग, शौचालय या ठिकाणी सीसीटीव्ही महापालिकेने बसविले आहेत. शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेबाबतीत कोणतीही हयगय केली जाणार नसून अधिकाधिक मनुष्यबळ वापरून उर्वरित शाळांचे सीसीटीव्ही नियंत्रण हे दिनांक 05 सप्टेंबर 2024 पूर्वी मध्यवर्ती केंद्रित करण्याचे सक्तीचे निर्देश मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.